


# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

■ संपादक : संजीव शाळगावकर

■ मुंबई ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सांगली

पुणे • वर्ष : ०६ • अंक : २९१ • शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ • किंमत : ३ रूपये • पाने : ४


## अमेरिकेच्या टॅरिफमुळे भारतीय वस्त्रोद्योग अडचणीत

**नवी दिल्ली : हॅलो प्रभात**

अमेरिकेने भारतीय वस्त्रोद्योगावर लादलेल्या ५० टक्के आयात शुल्कामुळे देशातील वस्त्रोद्योग निर्यातदारांवर गंभीर संकट ओढवले आहे. मात्र या गंभीर मुद्द्यावर देशाचे पंतप्रधान गप्प बसून आहेत, असा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी केला. रोजगार गमावणे, कारखाने बंद पडणे आणि निर्यात ऑर्डरमध्ये मोठी घट होत असल्याचेही राहुल गांधींनी नमूद केले. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर राहुल गांधी यांनी सध्याच्या आर्थिक परिस्थितीवर तीव्र शब्दांत टीका करत तिला 'डेड इकॉनॉमी' असे संबोधले. वस्त्रोद्योगाशी संबंधित सुमारे ४.५ कोटी रोजगार आणि लाखो छोटे-मोठे उद्योग धोक्यात असल्याचा इशाराही त्यांनी दिला. अमेरिकेच्या टॅरिफमुळे निर्माण झालेल्या अनिश्चिततेचा थेट फटका भारतीय निर्यातदारांना बसत असून सरकारकडून कोणताही दिलासा देण्यात आलेला नाही, असा आरोप त्यांनी केला.

# महाराष्ट्रात गुलामांचा बाजार

### राज ठाकरेंचा संताप : कल्याण-डोंबिवलीत जे सुरू आहे त्याची शिसारी आलीय

**मुंबई : हॅलो प्रभात**

बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त षन्मुखानंद सभागृहात आयोजित कार्यक्रमात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकाच मंचावर आले. या कार्यक्रमात संजय राऊत आणि अमित ठाकरेही उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना राज ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरेंच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, "बाळासाहेब हे हिंदुहृदयसम्राट, व्यंगचित्रकार आणि राजकारणी या अनेक पैलूंनी परिपूर्ण होते. त्यांचे व्यक्तिमत्व लोकांना नेहमी समजले नाही. मी त्यांच्यावर व्याख्यान देण्याची संधी मिळाल्यास त्यांचे सगळे पैलू मांडू इच्छितो."

राज ठाकरे यांनी राज्यातील राजकीय परिस्थितीवरही आपला संताप व्यक्त केला. त्यांनी म्हटले, आज देशात आणि महाराष्ट्रात गुलामांचा बाजार निर्माण झाला आहे. मुंबईसह कल्याण-डोंबिवलीतील घटनांनी शिसारी येते. बाळासाहेब आज नसल्यामुळे थोडं बरं



झालं, नाहीतर त्यांना याचे खूप वेदना झाल्या असत्या. जुनी आठवण सांगताना राज ठाकरे म्हणाले की, "मी शिवसेनेतून बाहेर पडताना परिस्थिती वेगळी होती. पक्ष सोडणं नव्हतं, ते घर सोडणं होतं. नंतर मला आणि उद्धवला अनेक गोष्टी उमजल्या.

बाळासाहेबांच्या विशिष्ट निर्णयांवरही त्यांनी प्रकाश टाकला. राज ठाकरे यांनी सांगितले की, "बाळासाहेबांनी मला म्हटले होते की या देशातील हिंदूंना हिंदू म्हणून मतदान करायला लावेन. प्रमोद महाजन म्हणाले की ते शक्य नाही, त्यावर बाळासाहेब म्हणाले, मी तसं करायला लावेन.

यावेळी राज ठाकरे यांनी स्पष्ट केले की, बाळासाहेबांच्या जीवनातून आपल्याला शिकायला मिळते की व्यक्तिमत्वाच्या प्रत्येक पैलूला समजून घेणे आवश्यक आहे. हत्तीच्या गोष्टीप्रमाणे बाळासाहेब प्रत्येकाला वेगवेगळे वाटतात, पण त्यांचा सच्चा अर्थ जगाला समजला नाही. कार्यक्रमादरम्यान बाळासाहेबांच्या स्मृतीस श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आणि उपस्थितांनी त्यांच्या योगदानाचे गौरव केले.

## जिल्हा परिषद निवडणुकीत नेत्यांची मुले रिंगणात!

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे जिल्ह्यात सध्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे वारे वाहत आहेत. यानिमित्ताने राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा घराणेशाहीची चर्चा रंगली आहे. पुणे जिल्ह्यातील अनेक मातब्बर नेत्यांची दुसरी पिढी निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याने मतदारांचा कल कोणाकडे झुकतो, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. यंदाच्या जिल्हा परिषद निवडणुकीत राज्यातील प्रस्थापित राजकीय घराण्यांतील वारसदारांची मोठ्या प्रमाणात एन्ट्री होताना दिसत आहे. त्यामुळे ही निवडणूक केवळ स्थानिक प्रश्नांपुरती मर्यादित न राहता, दुसऱ्या पिढीची राजकीय कसोटी म्हणून पाहिली जात आहे. राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पहिल्यांदाच आपले चिरंजीव श्रीराज भरणे यांना राजकारणात उतरवले आहे. इंदापूर तालुक्यातील बोरी पंचायत समितीच्या निवडणुकीतून श्रीराज भरणे आपले राजकीय नशीब



आजमावणार आहेत. भरणे कुटुंबीयांची इंदापूर तालुक्यात मजबूत पकड असून, मतदार घराणेशाहीला संधी देतात की नव्या चेहऱ्यांकडे पाहतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. दुसरीकडे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या अंकिता पाटील-ठाकरे या सलग दुसऱ्यांदा निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत. त्यांनी जिल्हा परिषदेच्या बावडा गटातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मागील निवडणुकीचा अनुभव आणि ठाकरे कुटुंबाशी असलेले नाते, हे घटक त्यांच्या प्रचारात महत्त्वाची भूमिका बजावताना दिसत आहेत.

## संक्षिप्त...

### १२ दिवसांत चार वाघांचा मृत्यू

**नागपूर : हॅलो प्रभात**

नव्या वर्षात जानेवारी महिन्यात एकीकडे टायगर सफारीसाठी लोक मोठ्या प्रमाणात विदर्भातील जंगलात गेले असताना पहिल्या बारा दिवसांत चार वाघ मृत्युमुखी पडल्याने यासंदर्भातील बातम्यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गांभीर्याने दखल घेतली आहे. स्वतः जनहित याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. चार वाघ मृत्यूमुखी पडल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. उच्च न्यायालयाने जनहित याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले असून न्यायालयाने याप्रकरणी ॲड. चैतन्य ध्रुव यांची न्यायालयीन मित्र म्हणून नियुक्ती केली आहे. पुढील सुनावणी 18 मार्च रोजी होणार आहे.

### बाळासाहेब नक्षली म्हणून हाक मारायचे

**चंद्रपूर : हॅलो प्रभात**

शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन करताना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आपल्या राजकीय प्रवासातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. बाळासाहेबांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे हिंदुत्व आणि राजकारणाकडे पाहण्याची दृष्टी आजच्या सत्ताधाऱ्यांपेक्षा वेगळी होती, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी सध्याच्या राज्यातील महिला सुरक्षेच्या प्रश्नावरून सरकारवरही जोरदार टीका केली. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्याशी असलेल्या आठवणी सांगताना विजय वडेट्टीवार भावूक झाले. सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी आपण शिवसेनेत कार्यरत असताना गडचिरोली जिल्ह्यात बाळासाहेबांच्या अनेक सभा घेतल्याचे त्यांनी सांगितले. "बाळासाहेब मला नावाने हाक मारायचे नाहीत. मला पाहिल्यावर ते 'नक्षली आला' अशी हाक मारायचे," अशी आठवण त्यांनी यावेळी सांगितली. मात्र ही हाक टोमण्याची नसून आपुलकीची असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### सायबर फसवणुकीचा प्रयत्न

**नागपूर : हॅलो प्रभात**

नागपूर नागपूरमध्ये केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल वरिष्ठ अधिकारी असल्याची बतावणी करीत एका ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञाची लाखों रुपयांचीची फसवणूक करण्याचा प्रयत्न डॉक्टरांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे फसला. मिळालेल्या माहितीनुसार ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ तसेच COMHAD (UK) चे कार्यकारी संचालक व भारतीय बालरोग अकादमीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय बोधनकर यांना सकाळी एक फोन कॉल आला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने स्वतःला CISF कमांडंट असल्याचे सांगत CISF कर्मचाऱ्यांच्या सुमारे 90 मुलांची वैद्यकीय तपासणी करण्याची विनंती केली. देशाच्या सुरक्षेसाठी सेवा देणाऱ्या जवानांप्रती आदर व्यक्त करत डॉ. बोधनकर यांनी मानवीय भूमिकेतून ही तपासणी मोफत करण्यास सहमती दर्शवली. मात्र, संभाषणादरम्यान कॉल करणाऱ्याने अचानक 50 हजार रुपये आगाऊ रक्कम देण्याची मागणी करत QR कोड शेअर करण्यासाठी दबाव टाकला. यानंतर दुसऱ्या व्यक्तीने व्हिडिओ कॉल करून स्वतःला "मेजर रावत" असल्याचे सांगितले आणि फोनमधील मॅनेज/सेटिंग ऑप्शनवर क्लिक करण्यास सांगितले.

## आम्हाला लढायचे कसे हे कोणी शिकवू नये : उद्धव ठाकरे

**मुंबई : हॅलो प्रभात**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या प्रारंभी उद्धव ठाकरेंनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देत, राज ठाकरेंसोबत आपण 'वादळात' खेळून मोठे झाल्याचे आवर्जून सांगितले. वडिलांशी असलेले नाते आणि आईने (मा) घर सावरण्यात दिलेल्या योगदानाचा गौरव करतानाच त्यांनी आपल्या घराण्याबद्दल सार्थ अभिमान व्यक्त केला. तसेच, विरोधकांवर आणि गद्दारांवर कडाडून टीका करताना 'गद्दारी हा महाराष्ट्राला लागलेला शाप' असल्याचे सांगून, भगव्याशी गद्दारी झाली नसती तर महाराष्ट्राने जगाचा इतिहास बदलला असता, असा रोखठोक विचार त्यांनी यावेळी मांडला. उद्धव ठाकरे म्हणाले, आजपासून शिवसेनाप्रमुखांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत आहे. पुढच्या वर्षी 100 वर्ष पूर्ण होणार आहेत. आपण अनेकांनी चढ उतार पाहिले आहेत. राज आणि माझे बालपण एकत्र गेले आहे. आम्ही वादळात खेळत मोठे झालो आहोत. त्यामुळे आम्हाला वादळाशी कसे लढायचे, हे आम्हाला कोणी शिकवण्याची गरज नाही. आज आपल्याशी बोलताना तो सगळा काळ डोळ्यांसामोरून जात आहे.

## बाळासाहेबांच्या स्वप्नांची मोदींकडून पूर्तता : एकनाथ शिंदे

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतेच बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी निमित्त विविध नागरी व सामाजिक कल्याण मोहिमांची घोषणा केली. शिंदे यांच्या म्हणण्यानुसार, महापालिका निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला, तर शिवसेना दुसऱ्या क्रमांकावर आली असून, चांदा ते बांदा शिवसेना आता घराघरापर्यंत पोहोचली आहे. यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले, "बाळासाहेबांचे स्वप्न होते की अयोध्येत राम मंदिर उभारले जावे आणि जम्मू-काश्मीरमध्ये 370 कलम हटवले जावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दोन्ही



स्वप्नांची पूर्तता केली आहे. शिवसेना हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष आहे आणि हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे."

शिंदे यांनी बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानाचा आढावा घेत सांगितले की, 29 महापालिका आणि 394 नगरपालिकांमध्ये आरोग्य, स्वच्छता, पिण्याचे स्वच्छ पाणी, महिला बचत गट सक्षम करणे, प्लास्टिक मुक्त गडकिल्ले मोहिम अशा अनेक उपक्रमांची अंमलबजावणी होणार आहे. यासाठी नगरविकास विभागाकडून मोठ्या प्रमाणात निधी जाहीर करण्यात आला आहे.

ते म्हणाले, "बाळासाहेब हे कार्यकर्त्यांना मोठे करणारे नेते होते. आरोग्य आपल्या दारी असे अभियान आम्ही राबवत आहोत. सर्व महापालिका आणि नगरपालिकांमध्ये नागरिक कल्याणासाठी हे उपक्रम राबवले जात आहेत. महाराष्ट्रात शिवसेनेला नेहमीच सन्मान मिळाला आहे."

शिंदे यांनी महापालिका निवडणुकीतील युतीच्या कामगिरीवरही भाष्य केले. ते म्हणाले, "मुंबई, ठाणे, कल्याण-डोबिंवली, उल्हासनगरसह अनेक महापालिकांमध्ये युतीची सत्ता मिळाली आहे. कल्याण-डोबिंवली महापालिकेबद्दल बोलायचे झाले, तर महायुतीसोबत मनसेही आमच्यासोबत आहे. बहुमत नसणाऱ्यांनी स्वप्न पाहणे चुकीचे आहे. विकासाच्या मुद्द्यामध्ये मनसेने आम्हाला साथ दिली आहे."

## बदलापूरच्या घटनेने राज्याच्या अब्रुची लक्तरे वेशीवर!

**■ हर्षवर्धन सपकाळ ; लोकांच्या सहनशिलतेचा अंत पाहू नका**

**मुंबई : हॅलो प्रभात**

बदलापूरमध्ये एका लहान मुलीवरील लैंगिक अत्याचाराची घटना संताप आणणारी व शरमेने मान खाली घालायला लावणारी आहे. महाराष्ट्रात सर्व प्रकारच्या गुन्हेगारांनी उच्छाद मांडला असून सरकार व कायदा हतबल झाल्याचे दिसत आहेत. राज्यकर्त्यांमध्ये गुन्हेगारांवर कारवाई करण्याची धमकच राहिलेली नाही. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राला लाभलेले आतापर्यंतचे सर्वात निष्क्रीय, अकार्यक्षम व बेजबाबदार मुख्यमंत्री आहेत, असा घणाघाती



हल्ला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, चार-पाच वर्षांच्या मुलींवर अत्याचार होत असताना राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री, उपमुख्यमंत्री यांना झोप कशी लागते. दीड वर्षापूर्वी बदलापुरात लहान शाळकरी मुलींवर अशीच घटना घडली होती पण सरकारने या प्रकरणातील महत्वाच्या आरोपींना मोकळे सोडले. जनतेने रस्तावर उतरून तीव्र आंदोलन केल्यानंतर सरकारला खडबडून जाग आली होती पण पुढे या प्रकरणाचे काय झाले, हे राज्याने पाहिले आहे. भाजपा व संघाशी संबंधित शाळेत घडलेल्या या घटनेत शाळेच्या अध्यक्ष व सचिवावर कारवाई केली नाही. या गुन्ह्यात शाळेचा सचिव तुषार आपटेवर पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल असताना भाजपाने त्याला स्विकृत नगरसेवक केले होते. प्रशासन कामच करत नाही त्यामुळे गुन्हेगारांचे मनौधैर्य वाढले आहे. काल बदलापुरात झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी सरकारने कठोर कारवाई करावी, अन्यथा जनता रस्त्यावर उतरेल, असा इशाराही सपकाळ यांनी दिला आहे. राज्यात कायदा सुव्यवस्थेचा बोजावारा उडलेला आहे. मंत्री भरत गोगावलेंचा मुलगा एका प्रकरणात फरार होतो, तो वडिल मंत्र्यांच्या संपर्कात असतो पण पोलीस मात्र त्याच्यापर्यंत पोहचत नाहीत. असे मंत्री मंत्रीमंडळात आहेत, मुख्यमंत्री एवढे हतबल का आहेत? असा प्रश्न उच्च न्यायालयाला विचारावा लागतो. सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर संपदा मुंडे यांना भाजपाच्या माजी खासदाराच्या अत्याचाराला कंटाळून आत्महत्या करावी लागली पण या प्रकरणातही कारवाई झाली नाही.

## ओबीसी नोंदीविना जनगणना; एक एप्रिलपासून पहिला टप्पा

**मुंबई : हॅलो प्रभात**

करोनामुळे सहा वर्षे लांबलेल्या देशातील बहुप्रतीक्षित 'जनगणना २०२७' च्या पहिल्या टप्प्याची घोषणा झाली असून १ एप्रिलपासून या मोहिमेला प्रारंभ होणार आहे. ओबीसींच्या जनगणनेची मागणी महाराष्ट्रासह देशभरातून झाली असताना पहिल्या टप्प्यात मात्र त्याचा समावेश करण्यात आलेला नाही. पहिल्या टप्प्यात 'घरयादी' आणि 'गृहगणना' केली जाणार असून, यासाठी सरकारने ३३ प्रश्नांची यादी अधिसूचित केली आहे. प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाला १ एप्रिल ते ३० सप्टेंबर दरम्यान आपल्या सोयीनुसार ३० दिवसांचा कालावधी निवडून ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. जनगणना आयुक्तांनी जारी केलेल्या अधिसूचनेतील ३३ प्रश्नांपैकी १२ वा प्रश्न जातीबाबतचा आहे. मात्र तेथे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आणि इतर असे तीन पर्याय आहेत. इतर मागास वर्गाची माहितीचा वेगळा स्तंभ नाही. यापूर्वीच्या जनगणनेमध्ये अनुसूचित जाती व जमाती यांची गणना होत होती. ओबीसी व अन्य अशी स्वतंत्र नोंद यावेळीही होणार नाही. या मोहिमेअंतर्गत नियुक्त केलेले प्रगणक घराघरात जाऊन घराची मालकी, घराचा वापर आणि घराच्या बांधकामासाठी वापरलेले साहित्य (छप्पर, मजला इ.) याबद्दल माहिती घेतील.

### नराधमाला २७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी ; स्कूल व्हॅन मालकाला 24 हजारांचा दंड!

# बदलापुरात चिमुरडीवर अत्याचार!

**ठाणे : हॅलो प्रभात**

बदलापूर शहर पुन्हा एकदा लैंगिक अत्याचाराच्या घटनेमुळं हादरलं आहे. एका खासगी शाळेतील 4 वर्षीय चिमुरडीवर स्कूल व्हॅन चालकानं व्हॅनमध्येच लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली. या प्रकरणातील नराधम चालकाला शुक्रवारी कल्याण जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आलं. यावेळी पोलीस बंदोबस्तात तैनात करण्यात आला होता. दरम्यान, पोक्सो विशेष न्यायालयात हजर केलं असता 27 जानेवारीपर्यंत आरोपीला पोलीस कोठडी सुनावल्याची माहिती पीडितेचे वकील एम. पांडे यांनी दिली. चिमुकलीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणानंतर प्रशासन खडबडून जागं झालं आहे.



कल्याण प्रादेशिक परिवहन कार्यालयानं संबंधित स्कूल व्हॅनवर कडक कारवाई केली आहे. तपासादरम्यान या स्कूल व्हॅन चालवण्यासाठी कोणतीही वैध परवानगी नसल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. या गंभीर निष्काळजीपणाची दखल घेत प्रादेशिक परिवहन कार्यालयानं संबंधित व्हॅनचा परवाना रद्द करत स्कूल व्हॅन मालकाला 24 हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

बदलापूर पश्चिमेकडील एका खासगी शाळेत शिकणारी 4 वर्षीय चिमुरडी शाळा सुटल्यानंतर खासगी स्कूल व्हॅनमधून आपल्या घरी जात होती. त्यावेळी व्हॅनमध्ये कुणीही महिला मदतनीस नव्हती. याच गोष्टीचा फायदा घेत नराधम व्हॅन चालकानं चिमुरडीवर अत्याचार केला. मुलगी दुपारी वेळेत शाळेतून घरी न परतल्यानं तिच्या पालकांनी शोधाशोध सुरू केली, तसंच शाळेतही फोन केला. उशिरानं पीडित चिमुरडी घरी आल्यावर तिनं आपल्यासोबत घडलेला सगळा प्रकार आईला सांगितला. हा प्रकार ऐकून पालकांना धक्काच बसला. त्यानंतर पीडित मुलीच्या पालकांनी तत्काळ बदलापूर पोलीस ठाण्यामध्ये धाव घेतली. सुमारे दीड वर्षापूर्वी बदलापूर पूर्वेतील एका नामांकित शाळेत दोन चिमुरडींवर अत्याचार झाल्याच्या घटनेनं संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली होती. बदलापूरकरांच्या उद्रेकानंतर त्याच शाळेतील सफाई कर्मचारी अक्षय शिंदे याला पोलिसांनी अटक केली होती. नंतर पोलिसांच्या एन्काऊंटरमध्ये अक्षय शिंदे याचा मृत्यू झाला होता. आता पुन्हा असा प्रकार घडलेल्या बदलापूर शाळेत लहान मुला-मुलींच्या सुरक्षेच्या दुष्टीनं उपाययोजना नाहीत. दरम्यान, ही शाळा अनधिकृत असल्याचा आरोप बदलापूर नगरपालिकेच्या उपनगराध्यक्ष तथा शिक्षण सभापती प्रियंका दामले यांनी केला आहे. तसंच शाळा प्रशासनावर कारवाईच्या मागणीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचीही भेट घेणार त्यांनी सांगितलं.

### आरोपीला पोलीस कोठडी

**"व्हॅनमध्ये विद्यार्थ्यांची ने-आण करताना शिक्षण विभागाच्या आवश्यक नियमावलीचं पालन केलं जात नसल्याचं पालकांचं म्हणणं आहे. या घटनेची माहिती मिळताच काही स्वयंसेवी कार्यकर्ते आणि राजकीय नेत्यांनी पोलीस ठाण्याकडे धाव घेतली होती. आज आरोपीला न्यायालयात हजर केलं असता 27 जानेवारीपर्यंत आरोपीला पोलीस कोठडी सुनावली आहे," अशी माहिती एसीपी शौलेश काळे यांनी दिली आहे.**